नवरात्रीच्या देवीची आठवे रूप
महागौरी देवी



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**॥ आजचा सुविचार ॥**

सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

वर्ष : ०६ | अंक : ६६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# अर्थखात्यावरुन महायुतीत पुन्हा घडामोडी, सुनेत्रा पवार म्हणतात, कुठलाही वाद नाही

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधननंतर अर्थखात हे भाजपकडे गेलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या अर्थ खात्याची जबाबदारी सांभाळत आहेत. अजित पवार यांच्या निधननंतर सुनेत्रा पवार यांच्यावर उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सोपविण्यात आली. पण अर्थ खातं हे राष्ट्रवादीकडे सोपवण्यात आलं नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अर्थ खात्यावर दावा केला जातोय. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी अर्थ खात्याबाबत भाष्य केलं आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनीदेखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. विशेष म्हणजे अर्थ खात्याची मागणी याआधीदेखील राष्ट्रवादीकडून करण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा करण्यात येत आहे. भाजप खरंच राष्ट्रवादीला अर्थ खातं देतं का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

**प्रफुल्ल पटेल काय म्हणाले?**

कुणाची जबाबदारी कुणाकडे असावी? हे सर्व आम्ही चर्चा करुन ठरवलं होतं. त्या दरम्यान आमच्या नेत्यांचं दुखद अपघाती निधन झाल्यामुळे काही टेम्परारी अ‍ॅडजस्टमन करायची आमची तयारी होती. आमच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली होती आणि मला खात्री आहे जी काही चर्चा झाली होती त्याप्रमाणे आमच्या महायुतीत निर्णय होतील. मुख्यमंत्री तसे निर्णय घेतील, असं प्रफुल्ल पटेल म्हणाले आहेत.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी याबाबत प्रश्न विचारला. अर्थखात्यावरुन राष्ट्रवादीत नाराजी व्यक्त होत आहे, असं म्हणत पत्रकारांनी फडणवीसांना प्रश्न विचारला. त्यावर फडणवीसांनी खूप कमी शब्दांत उत्तर दिलं. त्याबाबत आमची चर्चा चालली आहे. त्या चर्चेत आम्ही बघून घेऊ, अशी प्रतिक्रिया फडणवीसांनी दिली.

रोहित पवार यांचा भाजपवर घणाघात

या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना प्रश्न विचारण्यात आला. यावेळी त्यांनी भाजपवर निशाणा साधला. राष्ट्रवादी काँग्रेसला अर्थ खातं मिळणार नाही. भाजपला मी फार ओळखतो. त्यामुळेच मी भाजपपासून लांब आहे. भाजपने अजित दादा गेल्यानंतर अर्थमंत्रीपद चोरुन घेतलं. ते अर्थमंत्रीपद देणारही नाहीत ही काळ्या दगडावर कोरलेली रेघ आहे, असं टीका रोहित पवार यांनी केली.

**सुनेत्रा पवार म्हणाल्या, 'महायुतीत वाद नाही'**

एकीकडे या सर्व घडामोडी आणि प्रतिक्रिया समोर येत असताना उपमुख्यंत्री सुनेत्रा पवार यांनी महयुतीत कुठलाही वाद नाही, असं स्पष्टीकरण दिलं आहे. नांदेडमध्ये मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्या प्रचासभेत सुनेत्रा पवार बोलत होत्या.

महायुतीत कोणताही वाद नाही. कारण बरेचजण चुकीच्या गोष्टी पसरवण्यामध्ये माहीर असतात. आम्ही महायुतीमधील सर्व घटकपक्ष एकत्र, एकसंघ आहोत. राजकारणात वेगवेगळे पक्ष असतात, वेगवेगळ्या विचारधारा असतात, कोणताही गैरसमज असेल तर तो चर्चेतून दूर केला पाहिजे. आपल्या एकजुटीबद्दल मतदारांच्या मनामध्ये विश्वास निर्माण झाला पाहिजे. म्हणूनच महायुतीची एकजूट ही आपली ताकद आहे हे लक्षात असू द्यावं, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या.

## महाकालीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या जत्थावर बिबट्याचा हल्ला !

**सुदैवाने ९ वर्षाचा मुलगा बचावला : चुनाभट्टी बस थांब्याजवळील घटना**



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, विसापूर (चंद्रपूर) :** चंद्रपूर येथील माता महाकालीचा महिमा सर्वदूर आहे. नवरात्रोत्सव दरम्यान भाविक जथ्याने पायी वारी करून मनोकामना पूर्ण करतात. बल्लारपूर येथील शांतीनगर वॉर्डातील दहाबारा भाविकांचा जत्था चंद्रपूर येथील महाकाली देवीच्या दर्शनाला जात होता. बल्लारपूर - चंद्रपूर मार्गावर चुनाभट्टी बस थांब्याजवळ अचानक बिबट्याने जत्थावर हल्ला केला. यामध्ये एका ९ वर्षाच्या मुलाला बिबट्याने सर्वासमक्ष उचलून नेले. यामुळे सर्वजण घाबरून आरडाओरड केली. सुदैवाने या हल्यात मुलगा थोडक्यात बचावला. गंभीर जखमी झालेल्या त्या मुलावर एका खासगी दवाखान्यात उपचार केले जात आहे. ही घटना शनिवार (दि.१७) रोजी रात्री ११ वाजता दरम्यान चुनाभट्टी बस थांब्याजवळ घडली.

बिबट्याच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मुलाचे नाव कार्तिक जाधव (वय ९) वर्षे असे आहे. विशेष म्हणजे कार्तिकचे आईवडील हैद्राबाद येथे राहतात. दोन महिन्यापूर्वी तो बल्लारपूर येथील शांतीनगर वॉर्डात राहणाऱ्या आत्याकडे आला होता. नवरात्रोत्सव सुरू असल्याने तेथील दहाबारा भाविकांचा जत्था आराध्यदैवत माता महाकालीच्या दर्शनासाठी पायी वारी करून मनोकामना पूर्ण करण्यासाठी देवीचा जयजयकार करत जात होता. बल्लारपूर ते चंद्रपूर १२ किमीचे अंतर पायी जाऊन माता महाकालीच्या दर्शन घेऊन नतमस्तक होतात. मनात बाळगलेली ईच्छा पूर्ण व्हावे, ही सदिच्छा बाळगतात. या भाबड्या आशेवर भाविकांचा जत्था चालला होता. मात्र, विसापूर बॉटनिकलची आवारभिंत ओलांडून बिबट्याने जत्थावर अचानक हल्ला केला. यामध्ये कार्तिक बिबट्याच्या तावडीत सापडला.

कार्तिक ला बिबट्याने उचलून पळ काढला. यामुळे सर्वांचा हाहाकार झाला. त्याचे दैव बलवत्तर म्हणून कार्तिक थोडक्यात बचावला. विशेष म्हणजे बल्लारपूर येथील वन परिक्षेत्र अधिकारी राजेंद्र घोरूडे व पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे यांच्या पथकाने रात्रीच्या अंधारात शोधमोहीम राबवली. मात्र कार्तिकचा शोध लागत नसल्याने सर्वजण हताश झाले. तब्बल दीड तासाने रस्त्याच्या एका बाजुला झुडपात हालचाल होताना दिसून आली. मोबाईलच्या उजेडात झुडूपात कार्तिक हालचाल करताना आढळून आला. जीवंत आहे म्हणून त्याला तातडीने पोलीस वाहनाने जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ नेण्यात आले. तेथे उपचार करून डोक्यात गंभीर दुखापत असल्याने एका खासगी दवाखान्यात त्याचे उपचार केला जात आहे. त्याची प्रकृती सुधारत असल्याची माहिती बल्लारपूर चे वन परिक्षेत्र अधिकारी राजेंद्र घोरूडे यांनी दिली.

## तडीपार आदेश धाब्यावर; लक्ष्मीनगर पोलिसांनी कोयत्यासह आरोपीला पकडले

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१८, येरवडा :** येरवडा येथील लक्ष्मीनगर परिसरात तडीपार आदेशाचा भंग करून वावरणाऱ्या बालाजी ऊर्फ बाल्या मोहन मिसाळ (वय २३, रा. संभाजी चौक, हैद्राबादी हॉटेलजवळ, लक्ष्मीनगर, येरवडा) याच्याकडून पोलिसांनी लोखंडी कोयता जप्त केला. पो. शि.राहुल परदेशी आणि पो.शि.अक्षय शिंदे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बालाजी मिसाळ याला पोलीस उपायुक्त परिमंडळ चार यांच्या आदेशानुसार दोन वर्षांसाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय आणि पुणे जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले होते. मात्र, १६ ऑक्टोबर रोजी रात्री सव्वाआठच्या सुमारास तो लक्ष्मीनगर परिसरात आढळून आला. त्याच्याकडे १५० रुपये किमतीचा लोखंडी कोयता मिळून आला. तसेच, संबंधित कालावधीत घातक शस्त्रे बाळगण्यास मनाई आदेश लागू होता.

याप्रकरणी लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याचे

वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक निखिल पवार पो.शि.कांबळे यांनी पुढील सदर कारवाई केली आहे.

## जिवतीतील १,२८० शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ द्या ; सीमावर्ती गावांचे प्रश्न तातडीने सोडवा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, राजूरा (चंद्रपूर) :** नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात राजूरा विधानसभा क्षेत्राचे आ. देवराव भोंगळे यांनी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची भेट घेऊन राजुरा विधानसभा मतदारसंघातील, विशेषतः अतिदुर्गम व आकांक्षित जिवती तालुक्यातील जनतेच्या हक्कांशी आणि विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आयुक्त बिदरी यांनी सर्व विषयांचे गांभीर्य विचारात घेऊन सकारात्मक कार्यवाहीचे स्पष्ट आश्वासन दिले आहे.

बैठकीदरम्यान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत जिवती तालुक्यातील १,२८० शेतकरी सर्व निकषांनुसार पात्र ठरत आहेत. मात्र, ऑनलाईन सातबारा अभावी फार्मर आयडी तयार होत नसल्याने ते प्रत्यक्ष लाभापासून वंचित आहेत, त्याकरता शासनाकडे केलेल्या माझ्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनी शासनाने शासन निर्णय (जीआर) काढून फार्मर आयडी शिवाय लाभ देण्याचा निर्णय केला; त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यानुसार प्रत्यक्ष लाभ देण्यात यावा, अशी मागणी केली. तसेच, दि. २९ जून २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत जिवती तालुक्यातील सीमावर्ती १५ गावांचा सातबारा तयार करणे, जिवती तालुक्यातील वनजमीनीचे निर्वणीकरण व पट्टेवाटप तसेच जिवती, कोदेपूर व गुडसेला या तीन लघुसिंचन तलावांचा प्रश्न व जिवती शहरातील घरकुलांचा डीपीआर अशा प्रमुख विषयांवर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीतील निर्देशानुसार प्रशासकीय स्तरावरून तातडीने प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू करावी या मागणीसह मतदारसंघातील इतर महत्वपूर्ण विषयासंबंधात यावेळी सकारात्मक चर्चा केली. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी सर्व विषयांची माहिती जाणून घेत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले. त्यामुळे जिवती तालुक्यातील शेतकरी, सीमावर्ती गावांतील नागरिक आणि घरकुल लाभार्थ्यांच्या प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



## 'जिजाऊ बस' वाटपात भाजपचा वरचष्मा; ७९५ बसगाड्या पक्षाच्या पालकमंत्र्यांच्या जिल्ह्यांत पोहोचल्या

**दि.१८, मुंबई :** एसटी महामंडळाच्या ताफ्यात दाखल होणाऱ्या तीन हजार जिजाऊ बसगाड्यांच्या वाटपात भाजपचे पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यांचा वरचष्मा राहिल्याचे दिसून येत आहे. पक्षाचे पालकमंत्री असलेल्या १७ जिल्ह्यांमध्ये १,४६६ बसगाड्यांचे वाटप नियोजित असताना ७९५ बसगाड्या प्रत्यक्षात पोहोचल्या आहेत. तर, शिवसेनेच्या पालकमंत्र्यांच्या नऊ जिल्ह्यांत १,०४५ बसगाड्यांचे नियोजन असून ५५० बसगाड्या वितरित झाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या जिल्ह्यांत ४५० बसगाड्यांचे वाटप नियोजित असताना २२१ बसगाड्या पोहोचल्या आहेत. एसटी महामंडळाच्या ताफ्यात एकूण तीन हजार जिजाऊ बसगाड्या दाखल होणार आहेत. १६ ऑक्टोबरपर्यंत १,५९१ बसगाड्यांचे वितरण झाले. १,४०९ बसगाड्या मिळाल्यावर त्याचे वाटप करण्यात येणार आहे. भाजपच्या पालकमंत्र्यांच्या अखत्यारीतील जिल्ह्यांसाठी एकूण १,४६६ बसगाड्यांचे नियोजन आहे. त्यापैकी ७९५ बसगाड्या वितरित झाल्या असून ६७० अद्याप मिळालेल्या नाहीत. या जिल्ह्यांत नागपूर, अमरावती, अकोला, धुळे, नाशिक, अहिल्यानगर आणि लातूरसह १७ जिल्ह्यांचा समावेश होतो. शिवसेनेच्या पालकमंत्र्यांच्या जिल्ह्यांसाठी १,०४५ बसगाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी ५५० बसगाड्या वितरित झाल्या असून ४९५ बसगाड्यांचे वितरण बाकी आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, कोल्हापूर, सातारा आणि जळगाव या जिल्ह्यांचा यात समावेश आहे.




**शटल फेऱ्यांवर भर !**

एसटी महामंडळाच्या अभ्यासानुसार, स्थानक-आगारापासून १५० किलोमीटर परिसरात ९५.४७ टक्के प्रवासी आढळले आहेत. या ठिकाणी एकूण फेऱ्यांपैकी ५०.४६ टक्के फेऱ्या चालवण्यात येतात.

पालकमंत्री किंवा लोकप्रतिनिधींच्या गरजांपेक्षा प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन बसगाड्यांचे वितरण करण्यात येत आहे. एसटीचा तोटा कमी करण्यासाठी जेथे प्रवाशांची मागणी अधिक तेथे बसगाड्या चालवण्यात येत आहेत. -प्रताप सरनाईक, परिवहनमंत्री आणि अध्यक्ष एसटी महामंडळ

**रायगडला बसगाडीची प्रतीक्षा !**

रायगड जिल्ह्यासाठी ८५ बसगाड्यांचे वाटप नियोजित असतानाही १६ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्याला एकही बस मिळालेली नाही. याउलट भाजपच्या पालकमंत्र्यांच्या अखत्यारीतील नाशिकमध्ये नियोजित ८०पैकी ८०, तर गडचिरोलीत ४०पैकी ४० बसगाड्या पोहोचल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पालकमंत्र्यांकडे असलेल्या बीड, पुणे, परभणी आणि बुलढाणा या चार जिल्ह्यांसाठी एकूण ४५० बसगाड्यांचे नियोजन आहे. त्यापैकी २२१ बस वितरित झाल्या असून, अद्याप २२९ बसगाड्या पोहोचणे बाकी आहे.

## मुंबईत टायगर श्रॉफच्या गाडीवर हल्ला !

**दि.१८, मुंबई :** बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्या गाडीवर हल्ला झाला आहे. मुंबईच्या जुहू येथे टायगर श्रॉफच्या गाडीवर अज्ञात आरोपींनी गोळीबार केला. आरोपींनी यावेळी सात ते आठ राऊंड फायर केले. घटनेचा एक व्हिडीओ समोर आला आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर परिसरात प्रचंड धावपळ झाली. यावेळी आरोपींनी सात ते आठ राऊंड फायर केल्याचा आवाज व्हिडीओत येत आहे. या घटनेत टायगर श्रॉफ हा थोडक्यात बचावला आहे. गोळीबारात गाडीच्या काचा फुटल्या आणि त्या शरिरात गेल्याने तो जखमी झाला आहे. तर त्याच्या कारचालकाच्या हाताला गोळी लागली आहे. तसेच यावेळी परिसरातील एका रिक्षाचालकाच्या हाताला गोळी लागली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली.



संबंधित घटना ही जुहू पोलीस ठाण्यासमोरच्या गल्लीत घडली आहे. या गल्लीत जमुनाबाई नर्सरी स्कूलचे प्लेग्राउंड आहे. इथे फुटबॉल खेळून टायगर घरी परतत होता, अशी माहिती आहे. याच दरम्यान त्याच्या गाडीवर गोळीबार झाला. आरोपी गोळीबार करुन तिथून पळून गेले. यानंतर स्थानिकांनी तातडीने जखमींना जवळील रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा केला जातोय. तसेच पोलीस आरोपींच्या शोधासाठी रवाना झाले आहेत. आरोपींचा युद्ध पातळीवर शोध सुरु आहे.




## शिक्षेचं रूपांतर संधीत करण्याची वेळ

तंत्रज्ञान कंपन्यांशी संबंधित अलीकडील घडामोडींनी पुन्हा एकदा अवघ्या जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे. अमेरिकेतील परदेशी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी निवासासाठी प्रायोजित करण्याच्या 'पर्म' प्रक्रियेतील कथित गैरवापराबद्दल आठ तंत्रज्ञान कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे. हा केवळ स्थलांतरविषयक नियमांचा प्रश्न नाही. जागतिक उद्योगव्यवस्था, मनुष्यबळाची मागणी आणि तंत्रज्ञानाचा वापर यांच्यात वेगाने बदलणाऱ्या समीकरणाचं हे एक लक्षण आहे. यामुळे भारतीय व्यवसाय, रोजगार, शिक्षण आणि एकंदर सामाजिक व्यवस्थेचा विचार करणं गरजेचं आहे.

यात भर म्हणून की काय, कृत्रिम बुद्धिमत्ता उद्योगांतील काम करण्याच्या पद्धती बदलत आहे. पूर्वी मोठ्या संख्येने नवोदित कर्मचाऱ्यांकडून करून घेतली जाणारी कामे आता एआयच्या मदतीने अधिक वेगाने आणि कमी मानवी हस्तक्षेपासह करता येऊ लागली आहेत उदा. माहितीचे संकलन, प्राथमिक विश्लेषण, कोडिंग, सॉफ्टवेअर चाचणी, अहवालनिर्मिती आणि विविध प्रणालींमधील माहितीचे आदानप्रदान. अर्थात असं प्रत्येक काम एआय स्वत: पूर्णपणे करेल असं नाही; परंतु काही कामांसाठी लागणारा वेळ आणि मनुष्यबळ कमी करण्याची त्याची क्षमता नाकारता येत नाही

भारतासाठी हा बदल विशेष महत्त्वाचा आहे. गेल्या काही दशकांत भारतीय आयटी उद्योगाने जागतिक कंपन्यांना कुशल मनुष्यबळ आणि तंत्रज्ञानाधारित सेवा पुरवून मोठी मजल मारली. परदेशात शिक्षण आणि रोजगार मिळवणे हे तरुण पिढीचे स्वप्न बनले. परंतु विकसित देशांनी तेथील स्थानिकांच्या हाताला काम मिळावं याकडे कटाक्ष वळवला आहे. त्यासाठी त्यांनी परदेशी तंत्रज्ञाला नोकरीवर ठेवायचंच असेल तर तसं कौशल्य स्थानिकांना जमत नाही हे सप्रमाण सिद्ध करावं, असे कडक नियम आणले. अर्थात हे वावगं आहे असं म्हणता येणार नसलं तरी केवळ स्वस्त व कुशल मनुष्यबळ पुरवण्यावर आधारित विकासाच्या मॉडेलवर प्रश्न उभा ठाकतो.

परदेशातून असे काहीजण आधीच परतले आहेत किंवा त्यावर विचार करीत आहेत. अशा अनुभवी व्यावसायिकांना सुरुवातीला भारतांतील ग्लोबल कॅपॅसिटी सेंटर्स मध्ये संधी मिळण्याची शक्यता आहे. या केंद्रांमध्ये जागतिक कंपन्यांची तंत्रज्ञान, वित्त, जोखीम विश्लेषण, संशोधन अशी काही महत्त्वाची कामं केली जातात. अशा ठिकाणी एआयचा वापर सुरू झाला तर परिस्थिती कठीण होत जाईल.

अशा सर्व बदलांचा परिणाम म्हणजे भविष्यात भारताला केवळ मनुष्यबळ उपलब्ध करून देणे पुरेसे ठरणार नाही. त्या ऐवजी अधिक मूल्य निर्माण करणारे तंत्रज्ञान, नवी उत्पादने, सुधारित प्रक्रिया आणि नवे व्यवसाय विकसित करण्याची क्षमता निर्माण करावी लागेल. त्यासाठी योग्य ते प्रशिक्षण द्यावं लागेल, मात्र आपली पारंपरिक शिक्षण व्यवस्था अशा स्थित्यंतरासाठी तयार आहे का? दुसरं म्हणजे, नोकऱ्यांची शाश्वती नसताना आणि एआय, एलएलएमसारख्या बॉट्समुळे हवं ते ज्ञान कधीही, कुठेही उपलब्ध होत असेल तर मग विद्यार्थी महाविद्यालयात येतीलच कशासाठी?

**शिक्षणव्यवस्था बदलावी लागेल...**

अगदी काल परवापर्यंत ज्ञान मिळवण्यासाठी शिक्षक, शिक्षणसंस्था, ग्रंथालये, पाठ्यपुस्तके ही प्रमुख साधने होती. आज ऑनलाइन अभ्यासक्रम, युट्युबवरील कोर्सेस, डिजिटल ग्रंथालये आणि एआय आधारित साधनांनी ज्ञानाची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर वाढवली आहे. भाषा आणि भौगोलिक अंतर यांचे अडथळेही तंत्रज्ञानामुळे कमी लागले आहेत. मात्र निव्वळ माहिती मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे आणि शिक्षण म्हणजे प्रत्यक्ष कौशल्यही नव्हे. पुढील काळांत ज्ञानाचा वापर करून समस्या सोडवणे, प्रयोग करणे, निर्णय घेणे, चुका ओळखणे आणि बदलत्या परिस्थितीनुरूप नव्याने शिकणे अशा विशेष क्षमता विकसित कराव्या लागतील.

म्हणूनच भविष्यातील शिक्षणाचा उद्देश हा प्रत्येकाला संगणकशास्त्रज्ञ, डेटा विश्लेषक किंवा एआय तज्ज्ञ बनवणे हा नसावा. प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीला आपल्या व्यवसायात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करता यावा, असा असावा. एआय वापरणारा शेतकरी हा शेतकरीच असेल; एआयच्या मदतीने निदान करणारा डॉक्टर हा मूलतः डॉक्टरच असेल; नवीन डिझाइन तयार करणारा अभियंता, उत्पादनातील दोष शोधणारा कामगार, मार्गनियोजन करणारा लॉजिस्टिक्स व्यावसायिक किंवा आधुनिक साधनांचा वापर करणारा सुतार ` या प्रत्येकाच्या मूलभूत व्यवसायज्ञानाला तंत्रज्ञानाची जोड देणं आवश्यक ठरणार आहे.

**– डॉ.अतुल पाटणकर**

# पाणी कपात, काटकसर आणि नियोजन शिकणार कधी?

पाणी हे जीवनाचे अविभाज्य अंग आहे. पाण्याशिवाय मानवी जीवनाची कल्पनाही करता येत नाही. मात्र, पाण्याचे महत्त्व माहीत असूनही त्याचा काटकसरीने वापर करण्याची सवय आपल्याला अद्याप लागलेली नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. यंदा अपुऱ्या पावसामुळे महाराष्ट्रातील अनेक भागांवर दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. अशा परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना पाणी वापराबाबतची बेफिकिरी चिंताजनक आहे.



राज्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीपुरवठ्यात कपात करण्याचे निर्देश दिले जात आहेत. धरणांमधील पाणीसाठा मर्यादित असल्याने उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे ही काळाची गरज आहे. मात्र, केवळ पाणी कपातीचे आदेश देऊन प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी प्रशासनाने कठोर शिस्त लावण्याबरोबरच नागरिकांनीही पाणी वापराबाबत जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

एकीकडे नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जाते, तर दुसरीकडे अनेक ठिकाणी पाण्याच्या गळतीकडे दुर्लक्ष केले जाते. फुटलेल्या जलवाहिन्यांमधून हजारो लिटर पाणी वाया जाते. काही भागांत अनिर्बंध पाणी वापर सुरू असतो. वाहनांची धुलाई, रस्ते धुणे, इमारतींची स्वच्छता आणि बागांना पाणी देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पिण्याच्या पाण्याचा वापर केला जातो. काही ठिकाणी सार्वजनिक नळ सुरू ठेवले जातात, तर काही जण पाण्याचा अपव्यय करताना दिसतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी केवळ नियम नव्हे, तर नियमांची प्रभावी अंमलबजावणीही आवश्यक आहे.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग म्हणजेच पावसाचे पाणी साठवणे, छतावरील पाणी जमिनीत मुरवणे, विहिरी आणि बोअरवेलच्या पुनर्भरणाची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे हाती घेणे आणि सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे अशा उपाययोजना प्रभावीपणे राबवायला हव्यात. नवीन इमारतींमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था बंधनकारक करून जुन्या इमारतींमध्येही ती उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाण्याचे लेखापरीक्षण करून गळती आणि अनावश्यक वापरावर नियंत्रण ठेवले पाहिजे.

शेतीसाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींचा वापर वाढविणेही गरजेचे आहे. पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पीकपद्धतीत बदल करणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे आणि भूजलाचा अमर्याद उपसा टाळणे आवश्यक आहे. पाण्याचा प्रश्न हा केवळ शहरांचा किंवा ग्रामीण भागाचा प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या भवितव्याशी निगडित आहे.

पाणी ही निसर्गाने दिलेली अमूल्य देणगी असली, तरी त्याचा साठा अमर्याद नाही. आज पाण्याचा अपव्यय केला, तर उद्या पाण्याच्या एका घोटासाठी संघर्ष करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर जागे होण्यापेक्षा पाऊस भरपूर पडत असतानाच त्याचे नियोजन करणे अधिक शहाणपणाचे आहे.

प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे नियोजन पारदर्शकपणे करावे, गळती रोखावी आणि पाणी वाया घालवणाऱ्यांवर योग्य कारवाई करावी. त्याचबरोबर प्रत्येक नागरिकाने पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची सवय लावून घ्यावी. पाणी कपात ही तात्पुरती उपाययोजना असू शकते; परंतु पाणी बचत ही कायमस्वरूपी जीवनशैली बनली पाहिजे.

पाणी वाचवणे म्हणजे भविष्यातील पिढ्यांचे जीवन सुरक्षित करणे. पाणीटंचाईच्या संकटातून बाहेर पडायचे असेल, तर पाणी कपातीच्या आदेशांची वाट पाहण्यापेक्षा पाणी बचतीचा संकल्प प्रत्येकाने आजच करायला हवा. पाणी आहे म्हणून जीवन आहे; त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे ही केवळ सरकारची नव्हे, तर आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# नवजात बालकांचा प्राण वाचवणारी नवदुर्गा...!!

डॉ.रोशनी अनूप बर्डेस्कर या मूळच्या बेंगळुरू, कर्नाटक येथील असून बालरोगतज्ज्ञ व नवजात शिशुरोगतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी राजीव गांधी आरोग्य विज्ञान विद्यापीठ, बेंगळुरू येथून एमबीबीएस आणि बालरोगशास्त्रातील एमडी पदवी संपादन केली. एमडी अभ्यासक्रमात त्यांनी आपल्या महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला तसेच विद्यापीठ स्तरावर बालरोगशास्त्र विषयात पहिल्या दहा विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवले.

गेल्या सहा वर्षांपासून गडहिंग्लज येथे स्थायिक होऊन त्यांनी बालआरोग्य सुधारणा, कुपोषणाचे निर्मूलन आणि समाजातील वंचित घटकांना दर्जेदार नवजात शिशू उपचार उपलब्ध करून देण्यासाठी आपले कार्य समर्पित केले आहे.

**पोषण पुनर्वसन केंद्रातील (NRC) योगदान**

डॉ. रोशनी यांनी उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज येथे पोषण पुनर्वसन केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून आपल्या सेवेला सुरुवात केली. या केंद्रामध्ये गंभीर कुपोषणाने ग्रस्त बालकांवर विशेष उपचार व पुनर्वसन केले जाते. तीन वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी सुमारे १५० कुपोषित बालकांवर यशस्वी उपचार केले. कुपोषणामुळे बालकांची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन वारंवार आजार होण्याची शक्यता वाढते, हे लक्षात घेऊन त्यांनी कुपोषित बालकांची लवकर ओळख पटविण्यासाठी तपासणी प्रक्रिया अधिक प्रभावी केली. पालकांमध्ये पोषणविषयक जागरूकता वाढवली आणि कुपोषणाचा धोका असलेल्या बालकांसाठी शैक्षणिक व जनजागृती कार्यक्रम आयोजित केले. त्यांच्या कार्यकाळात केंद्राचे नूतनीकरण व उन्नतीकरण करण्यात आले. केंद्रातील प्रवेशसंख्या आणि बेडचा वापर वाढला. तसेच दाखल झालेल्या सर्व बालकांनी निर्धारित लक्ष्य वजन प्राप्त केले, ज्यामुळे त्यांच्या पोषणस्थितीत सुधारणा होऊन निरोगी वाढ व विकासाला चालना मिळाली. या अनुभवातून योग्य उपचारांसोबतच कुपोषणाविषयी जागरूकता, लवकर निदान आणि पालकांचे समुपदेशन हे कुपोषण व वारंवार होणाऱ्या आजारांचे दुष्टचक्र तोडण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याची जाणीव त्यांना झाली.

**विशेष नवजात शिशू उपचार कक्षातील (SNCU) योगदान...**

पोषण पुनर्वसन केंद्रात तीन वर्षे सेवा दिल्यानंतर त्यांनी नवजात शिशुरोगशास्त्रातील विशेष प्रशिक्षण घेतले आणि नॅशनल निओनेटॉलॉजी फोरम (NNF), भारत यांच्यामार्फत फेलोशिप पूर्ण केली. नवजात शिशूंच्या उपचारांबद्दलची विशेष आवड आणि प्रत्येक बालकाला जगण्याची संधी मिळाली पाहिजे हा विचार मनात ठेवून त्या पुन्हा उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज येथे रुजू झाल्या आणि विशेष नवजात शिशू उपचार कक्षात (SNCU) वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्य करू लागल्या.

एका वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी सुमारे ४०० ते ५०० नवजात शिशूंच्या उपचारांमध्ये योगदान दिले.

**त्यांच्या कार्यातील काही महत्त्वपूर्ण यशस्वी उपचार पुढीलप्रमाणे आहेत :**

✻ गर्भावस्थेच्या अत्यंत कमी कालावधीत जन्मलेल्या आणि ९०० ग्रॅम ते १ किलो वजनाच्या तीन



**- डॉ.रोशनी अनूप बर्डेस्कर**
**बालरोगतज्ज्ञ व नवजात शिशुरोगतज्ज्ञ**

अतिशय कमी वजनाच्या नवजात बालकांवर यशस्वी उपचार.

✻ न्यूमोथोरॅक्स या गंभीर स्थितीने ग्रस्त असलेल्या दोन नवजात बालकांचे यशस्वी व्यवस्थापन. या स्थितीत फुफ्फुस आणि छातीच्या भिंतीमधील जागेत हवा साचते.

✻ गंभीर रक्तसंसर्गासोबत प्रसारित अंत:वाहिनीय रक्त गोठण्याची समस्या (DIC) निर्माण झालेल्या एका नवजात बालकावर यशस्वी उपचार.

जन्मजात व्यंग असलेल्या बालकांच्या उपचारांसाठीही त्यांनी विविध वैद्यकीय शाखांतील तज्ज्ञांच्या समन्वयातून उपचार उपलब्ध करून देण्यात योगदान दिले आहे.

त्यांच्या प्रयत्नांमुळे गडहिंग्लज परिसरातच गंभीर आजारी आणि मुदतपूर्व जन्मलेल्या बालकांना विशेष उपचार मिळण्यास मदत झाली असून, उपचारांसाठी कोल्हापूर येथे जावे लागणाऱ्या कुटुंबांची गरज कमी करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.

**बर्डेस्कर हॉस्पिटलमधील परवडणारी नवजात शिशू अतिदक्षता सेवा...**

प्रगत नवजात शिशू उपचारांचा खर्च अनेक कुटुंबांना परवडत नाही, ही बाब लक्षात घेऊन डॉ. रोशनी यांनी बर्डेस्कर हॉस्पिटल, गडहिंग्लज येथे महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत (MJPJAY) नवजात शिशू अतिदक्षता उपचार सेवा सुरू केली.

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत सुमारे ५० नवजात बालकांना योजनेअंतर्गत मोफत उपचार देण्यात आले आहेत. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना तज्ज्ञ उपचार उपलब्ध होण्यास मदत झाली असून त्यांच्या खिशातून होणारा वैद्यकीय खर्च कमी करण्यास हातभार लागला आहे.

**ध्येय आणि सामाजिक बांधिलकी...**

डॉ. रोशनी यांच्यासाठी हे यश केवळ वैद्यकीय उपलब्धी नसून सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे. बालकांमधील कुपोषण कमी करणे, नवजात बालकांचे प्राण वाचवणे आणि प्रत्येक कुटुंबाला त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न करता आवश्यक उपचार उपलब्ध करून देणे, हे त्यांच्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

पोषण पुनर्वसन केंद्र, शासकीय आरोग्यसेवा आणि नवजात शिशू अतिदक्षता उपचार या क्षेत्रांतील त्यांच्या कार्यातून बालकांचे आजारपण व मृत्यू कमी करण्यासाठी आणि समाजातील सर्वात वंचित घटकांपर्यंत परवडणारी, दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत. नवजात शिशूंच्या विशेष उपचार क्षेत्रातील त्यांचा प्रवास अद्याप सुरू असला, तरी आपल्या समाजाच्या आरोग्यसेवेत योगदान देता येत असल्याचा त्यांना अभिमान आहे. भविष्यात नवजात शिशू उपचार सेवा अधिक सक्षम करणे आणि अधिकाधिक गरजू कुटुंबांपर्यंत प्रगत व परवडणारी आरोग्यसेवा पोहोचवणे, हे त्यांचे ध्येय आहे.

त्यांचा दृढ विश्वास आहे की, प्रत्येक नवजात बालकाला जगण्याची आणि निरोगी आयुष्य जगण्याची संधी मिळाली पाहिजेकुटुंबाची आर्थिक परिस्थिती किंवा ते कोणत्या ठिकाणी राहतात, याची पर्वा न करता पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या.

## नवम् रुप

सिध्ददात्री दुर्गारुप
नवरात्री नवम्दिनी
सु संपन्न महोत्सव
मा भवानी नन्दिनी

चतुर्भुजा आईराजा
कमलासन वासिनी
सौहार्द स्नेहे पाहते
मातादिकमलनयनी

अष्टसिद्धी सुखेनैव
पायी घेती लोळणी
सरस्वती तू अंबाई
ज्ञान झाडी झुळणी

उर्जा देते जगताला
दिव्यालंकार भुषणी
भक्त कष्ट निवारते
तू भवसागरतारिणी

शिवस्वरूपा संलग्न
मुग्धहसे विलोभिनी
अर्धनारी नटेश्वराला
भार्यारुपे सुशोभिनी

वातावरण निरामय
कुमारिकेच्या पुजनी
दिस कसे सहज सरे
नवोत्सवाच्याभजनी

**✍ - हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे राजकारणातील महत्व कमी केलं जातंय का ?

भारत सरकारचे केंद्रीय कृषिमंत्री तथा मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान ऊर्फ मामाजी शांत, संयमी नेते म्हणून ओळखले जातात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री भूषविलेल्या चौहान यांनी पक्षांतर्गत घडामोडीबाबत अथवा वादग्रस्त विधाने वा टिक्काटिप्पनी केल्याचे कधी दिसून आलेले नाही आणि ते अगदी बरोबर आहे.

मात्र सद्या मध्य प्रदेशातील शिवराजसिंह चौहान यांनी प्रतिनिधित्व केले त्या मतदार संघातील १२ आदिवासी कुटुंबाची घरे वन विभागाने हटवली त्यामुळे ते दुखावले गेले आहेत. एकंदरीत राज्याच्या राजकारणातील बडे नेते चौहान यांचे महत्व कमी करण्याचे कारस्थान भाजपच्या शिर्ष नेतृत्वाचे असावे की काय ? अशी शंका उपस्थित होते आहे.

वास्तविक पाहता भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने मध्य प्रदेशात शिवराजसिंह चौहान, राज्यस्थांनमध्ये वसुंधराराजे छत्तीसगडमध्ये रमणसिंह या प्रस्थापित नेत्यांना डावलून नव्या चेहऱ्यांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली असली तरी ओडिसा, दिल्ली, हरियाणा या राज्यांतील मुख्यमंत्र्यांवर पक्षातून टीका केली जाते आहे भाजपाने नव्या दमाची पिढी पुढे आणली असली तरी ती अजून राजकारणात स्थिरावलेली नाही त्यामुळे वादापासून दूर राहणाऱ्या चौहान यांनी या नव्या मंत्र्यांना तुम्ही मुख्यमंत्री कसे झालात ते लक्षात घ्या असे सुनावतो तेंव्हा पक्षांतर्गत सारे आलेबल नाही हेच स्पष्ट होते.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज


## थोडक्यात बातम्या

### मौजा चिंतलधाबाच्या सन १९७६च्या भूसंपादन प्रकरणातील भूमिहीन शेतकऱ्यांना न्याय मिळणार का?

**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१८, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** पोंभुर्णा तालुक्यातील मौजा चिंतलधाबा येथील भूमीहीन शेतकऱ्यांना सण १९७६ मध्ये शासनाच्या भूमिहीन योजना अंतर्गत चिंतल धाबा येथील गट क्रमांक १व २ मधील शेत जमिनीचे वाटप करण्यात आले होते. सदर जमिनीचा लाभ परिसरातील अंदाजे ६० शेतकरी बांधवांना मिळाला असून प्रत्येक शेतकऱ्यांना २.०२ हे. आर जमीन वाटप करण्यात आली. सदर शेतकऱ्याकडे जमिनीचे सातबारा नमुना आठ लाल पुस्तिका तसेच वहिवाटीचे कागदपत्रे उपलब्ध आहे. मात्र, गेल्या ५० वर्षापासून संबंधित जमिनीचे शासकीय नकाशे व इतर आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाले नाही त्यामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यात अडचणीचा सामना करावा लागत आहे.

या संदर्भात संबंधित शेतकऱ्यांनी भूमी अभिलेख कार्यालय, तहसील कार्यालय पोंभुर्णा, वनविभाग कार्यालय येथे वारंवार पाठपुरावा करून सुद्धा प्राप्त होऊ शकले नाही.

या पार्श्वभूमीवर संबंधित भूमी अभिलेख विभाग तहसील कार्यालय तसेच वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संयुक्त बैठक घेऊन प्रकरणाची सखोल चौकशी करावी आवश्यक अभिलेख व नकाशे उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी भाजपा तालुका अध्यक्ष हरी पाटील ढवस, अरुण कत्तरमारे, राजाराम मोहूरले, प्रकाश बेलेकर, राजेश्वर मेश्राम, प्रवीण चनूरवार, आनंदराव भाकरे व समस्त संबंधित शेतकरी यांनी निवेदनातून आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे मागणी केली आहे. निवेदन स्वीकारून सदर प्रकरणाची दखल घेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी माननीय जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून विभागाशी संबंधित अधिकाऱ्याची बैठक बोलावून हे प्रकरण तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना दिले आहेत.

आता प्रशासन या प्रकरणात कोणती कारवाई करते आणि संबंधित शेतकऱ्यांना कधी न्याय मिळते याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### देशी झाडांच्या वृक्षारोपणाद्वारे रबाळे येथे सेवा संकल्प अभियानाची सांगता...



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध सेवाभावी उपक्रम राबवित नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या सेवा संकल्प अभियानाची सांगता आज विविध सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून झाली. त्यामध्ये रबाळे येथील डोंगराळ भागात देशी वृक्षरोपांच्या लागवडीचा पर्यावरणशील उपक्रम सर्व वयोगटातील नागरिकांच्या उत्साही उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी उपमहापौर दशरथ भगत, समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती सदस्य रंजना सोनवणे, नगरसेवक तथा माजी महापौर सुधाकर सोनवणे, वृक्षप्राधिकरण सदस्य ज्ञानेश्वर नाईक व विनोद म्हात्रे, माजी नगरसेविका डॉ.गौतमी सोनवणे तसेच उद्यान विभागाच्या उपआयुक्त स्मिता काळे, शासनाच्या वन विभागाचे सहा. वनसंरक्षक सोनल वळवी, रेंज फॉरेस्ट ऑफिसर नरेंद्र मुठे, वन अधिकारी प्रवीण आव्हाड, विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त संजय तडवी आणि उपस्थित मान्यवर व नागरिकांच्या हस्ते देशी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

सेवा संकल्प अभियान महिन्याभराच्या कालावधीत आपण राबविले असले तरी हे सेवाकार्य पुढेही निरंतर सुरू ठेवण्यासाठी आपण सर्वजण कटीबद्ध असल्याचे सांगत या माध्यमातून सामाजिक दायित्व जपण्याचा निर्धार यावेळी बोलताना उपमहापौर दशरथ भगत यांनी व्यक्त केला. सुधाकर सोनवणे यांनी या भागात ५ हजाराहून अधिक वृक्ष लावून व वाढवून हाती घेतलेले हे वनीकरणाचे काम प्रशंसनीय व अनुकरण करण्याजोगे असून ते खरे श्रीमंत असल्याचे उपमहापौर म्हणाले. शासनाचे सहा. वनसंरक्षक सोनल वळवी यांनी जून महिन्याच्या सुरुवातीला आम्ही जेव्हा या जागेवर आलो होतो, तेव्हाची परिस्थिती आणि आज वृक्षारोपणामुळे कायापालट झालेली ही जागा पाहिल्यावर अचंबित झाल्याचे सांगत सुधाकर सोनवणे यांनी लोकसहभागातून उभे केलेले हे वनीकरणाचे कार्य कृतीतून परिवर्तन घडू शकते याचे मूर्तीमत उदाहरण असल्याचे सांगितले.

याप्रसंगी बोलताना नगरसेवक सुधाकर सोनवणे यांनी २००५ पासून या भागात सुरू झालेल्या या ५ हजारहून अधिक वृक्षांच्या वनीकरण प्रवासाकडे आज मागे वळून बघताना समाधान वाटते व अजून बरेच काही करण्याचे बाकी आहे ही प्रेरणा मिळते असे सांगत ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामान बदलाचे संकट पाहता पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येकाने स्व-जबाबदारी म्हणून ती स्वीकारली पाहिजे, हे जाणूनच ही अखंड लोकचळवळ उभी केल्याचे अधोरेखित केले.

### पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शारदाबाई पवार इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दांडिया व महाआरती



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१८, खराडी (पुणे) :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शारदाबाई पवार इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, खराडी येथे १७ ऑक्टोबर २०२६ रोजी नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने दांडिया व महाआरती कार्यक्रमाचे भव्य आणि उत्साही आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भक्तीमय आणि भावपूर्ण वातावरणात झालेल्या महाआरतीने झाली. देवीच्या जयघोषाने संपूर्ण शालेय परिसर दुमदुमून गेला होता. महाआरती संपल्यानंतर रंगीबेरंगी आणि आकर्षक पारंपरिक पोशाखात सजलेले विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी दांडियाचा मनमुराद आनंद लुटला. ढोल-ताशांच्या आणि गरब्याच्या तालावर सर्वांनी ठेका धरल्यामुळे संपूर्ण वातावरण अतिशय आनंदमयी आणि उत्साही बनले होते.

हा संपूर्ण सोहळा शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा गुळवे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्ध व भव्य स्वरूपात पार पडला. या प्रसंगी बोलताना मुख्याध्यापिका सौ. सुरेखा गुळवे यांनी उपस्थित सर्वांना नवरात्रौत्सव आणि दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच, हा कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित करून तो उत्तम रीत्या पार पाडल्याबद्दल त्यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती आणि सणांविषयीची आवड व एकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत झाली, अशी भावना पालकांनी व्यक्त केली आहे.

## शेतकरी स्वाभिमानी, लाचार नाही; भरीव मदत आणि सरसकट कर्जमाफी द्या

### शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख ताजने यांची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या विविध समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे चंद्रपूर जिल्हाप्रमुख भास्कर ताजने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत, सरसकट कर्जमाफी, अखंडित वीजपुरवठा आणि आगामी हंगामासाठी बियाणे व खतांवर १०० टक्के अनुदान देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, पावसाअभावी शेतातील उभी पिके सुकत शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. वर्षभर मेहनत करुन ही निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देणे ही शासनाची जबाबदारी आहे. शेतकरी हा स्वाभिमानी असतो, लाचार नसतो, स्वत:च्या कष्टाच्या बळावर जगणारा अन्नदाता आज निराशेत आहे. त्याला तुटपुंज्या मदतीची नव्हे, तर कष्टांचा सन्मान राखणाऱ्या ठोस निर्णयाची गरज आहे. शेतकरी वाचला, तर महाराष्ट्र वाचेल, अशा शब्दात निवेदनात ठाम भूमिका मांडण्यात आली आहे. शासनाने तातडीने मदतीचा हात देऊन मदत करण्याची मागणी भास्कर ताजने यांनी केली आहे.

*** शेतकऱ्यांसाठी ७ प्रमुख मागण्या**

ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सोय आहे, त्यांची उभी पिके वाचवण्यासाठी किमान २४ तास सुरळीत आणि विश्वासार्ह वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात यावा. दिवाळीपूर्वी जाहीर केलेली ५ हजार रुपयांची मदत ही अतोनात नुकसानीच्या मानाने अत्यंत अपुरी आहे. शासनाने तात्काळ नुकसानीचा योग्य आढावा घेऊन भरीव व सन्मानजनक आर्थिक मदत जाहीर करावी. आगामी हंगामासाठी लागणारे खते व बियाणे शेतकरी बांधवांना १०० टक्के अनुदानावर पुरवण्यात यावा. कोणत्याही अटी-शर्तींत न अडकवता, राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करत सरसकट संपूर्ण कर्जमाफी जाहीर करण्यात यावी.

राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी ठोस रोजगार संधी उपलब्ध कराव्यात. शेतकऱ्यांना केवळ सौरऊर्जेवर अवलंबून न ठेवता शेतीच्या गरजेनुसार नियमित व शाश्वत वीजपुरवठा द्यावा. शेतमालाची वाहतूक सुलभ व्हावी, यासाठी शिव-पाणंद व शेतरस्त्यांची नवीन निर्मिती करावी आणि अस्तित्वातील रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करावी.

## वाकी दरबारातील संत राजूबाबा दुर्गामाता मंदिरात नवरात्रोत्सवाचा भक्तिमय सोहळा

### ३८१ घटांची स्थापना; अष्टमीला अभिषेक, हवन, गोंधळ, गरबा आणि महाप्रसादाचे आयोजन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** श्री संत ताजुद्दीन बाबा वाकी दरबारच्या पाठीमागे असलेल्या श्री संत राजूबाबा दुर्गामाता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी ३८१ घटांची स्थापना करण्यात आली असून सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर रोजी अष्टमी उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवाच्या प्रथम दिवशी रविवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्री संत ताजुद्दीन बाबा वाकी ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकरराव डहाके पाटील (गुरुजी) आणि पंडित पवन मिश्रा यांच्या हस्ते घटस्थापना, कळस स्थापना व दीपप्रज्वलन करण्यात आले. दुपारी १२ वाजता महाआरती पार पडली. नवरात्रोत्सवाच्या कालावधीत मंदिरात दररोज सकाळी व संध्याकाळी अभिषेक आणि आरती केली जात आहे.

*** अष्टमीला धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी**

सोमवारी सकाळी ९ वाजता मातेच्या पादुकांचा अभिषेक आणि त्यानंतर हवन करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता गोंधळाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर गरबा व कन्याभोजन आयोजित करण्यात आले असून दुपारी २ वाजता भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. नवरात्रोत्सवाच्या आयोजनात ठाकूर बाबा, काशिनाथ ढोके, भूषण मानकर आणि कपिल कडू यांनी अखंडित सेवा देत आहेत.

*** संत परंपरेचा वारसा अन् हिंदू - मुस्लिम ऐक्याचा संदेश**

श्री संत ताजुद्दीन बाबा यांच्या भक्तिपरंपरेशी जोडलेले संत राजूबाबा यांनी वाकी येथे सुमारे १० ते १२ वर्षे वास्तव्य केले. वाकी दरबारच्या पाठीमागे असलेले श्री संत राजूबाबा दुर्गामाता मंदिर हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मंदिर परिसरात दुर्गामातेच्या मंदिरासोबत भगवान शिवजी चे मंदिर ही




आहे. श्री संत ताजुद्दीन बाबा वाकी दरबार आणि संत राजूबाबांच्या वास्तव्याशी जोडलेला हा परिसर विविध धार्मिक परंपरांचा संगम दर्शवतो. श्रद्धा, परस्पर आदर आणि सामाजिक सलोख्याची भावना जपणारे हे स्थळ हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देणारे महत्त्वाचे श्रद्धास्थान मानले जाते. अष्टमी उत्सवाला सर्व घटधारक व भाविकांनी उपस्थित राहून मातेचे आशीर्वाद घ्यावेत आणि धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत ताजुद्दीन बाबा वाकी ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकरराव डहाके पाटील (गुरुजी) यांनी केले आहे.

## सावनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक संपन्न

### महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत वंजारी यांच्या प्रचारासाठी एकजुटीने काम करा; सलील दादा देशमुख यांचे आवाहन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) नागपूर जिल्हा ग्रामीणच्या वतीने महाविकास आघाडीचे नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार अभिजीत गोविंदराव वंजारी यांच्या प्रचारार्थ सावनेर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष सलील दादा देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हनुमान मंदिर, ढोमणे ले-आऊट, छिंदवाडा रोड, पराये वेल्डिंगजवळ, सावनेर येथे शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता ही बैठक पार पडली.

या बैठकीत पक्षसंघटना मजबूत करण्यासह आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांची भूमिका, प्रचाराचे नियोजन आणि महाविकास आघाडीच्या माध्यमातून समन्वयाने काम करण्याबाबत चर्चा करण्यात आली.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष सलील दादा देशमुख यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत वंजारी यांच्या प्रचारासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने आणि जोमाने कामाला लागावे, असे आवाहन केले. महाविकास आघाडीचा धर्म पाळून निवडणुकीच्या प्रचारात सक्रिय सहभाग घ्यावा तसेच उमेदवाराच्या विजयासाठी समन्वयाने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

याशिवाय, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी गावागावांत आणि स्थानिक स्तरावर कार्यकर्त्यांनी सक्रिय राहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आगामी काळातील निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातून एकत्रितपणे लढण्यासाठी आतापासूनच तयारीला लागावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.




बैठकीला प्रदेश प्रवक्ते प्रवीण कुंटे पाटील, प्रदेश महासचिव अविनाश गोतमारे, प्रदेश कार्याध्यक्ष शैलेश तिवारी, सावनेर तालुकाध्यक्ष कपिल वानखेडे, जिल्हा उपाध्यक्ष नाना केने, पंकज चुकाबे, साबीर मिर्जा, अभिषेक सोमकुवर, अश्विन महाजन, विजय पांडे, राजू खाडे, रामू बसुले, अहिंसक पाटील, केशव पानतावणे, दिनेश इंगोले, यश ठाकरे, सौरभ कोहळे, नीलकंठ ढवागळे, आशिष केने, शुभम केने, यशवंत बारापात्रे, गुड्डू बोकडे,महेश केने, प्रकाश घोडमारे, मनोज चिकटे, प्रकाश डाखोले, मनीष ढोमणे, अतुल वानखेडे, जयंत सोमकुवर, काशिनंद गोडुळे, प्रकाश लांडगे, प्रफुल्ल महल्ले, देविदास मलमुले, नरेंद्र सोमकुवर, सतीश वाटकर, प्रकाश फाले, साहिल ढेपे, अनिकेत कापसे, आयुष सुके, सुजल बोकडे, अक्षय कडू, राहुल वानखेडे, कपिल मोंढे, रोशन मडावी, अमोल कानारकर आणि महेंद्र ताजने यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहूरच्या रेणुका मातेचं दर्शन घेऊन परतताना अनर्थ

**दि.१८, यवतमाळ :** माहूरच्या रेणुका मातेचे दर्शन घेऊन यवतमाळकडे परतणाऱ्या भाविकांचा टेम्पो सुमारे शंभर फूट खोल दरीत कोसळून तीन भाविकांचा जागीच मृत्यू तर चालकासह तिघे गंभीर जखमी झाले. शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारास माहूर घाटात हा भीषण अपघात घडला.

यवतमाळ येथील फर्निचरच्या दुकानातील सहा कामगार प्रतीक अडकिने ( वय२६), दत्ता मेश्राम (वय ३५), यशवंत पाटील ( वय २५), बाबाराव टेकाम (वय ६०), राहुल ठाकरे (वय २५), प्रीतम प्रधान (वय ३८) एमएच २९ बीई ६८५९ क्रमांकाच्या टेम्पोने गुरुवारी रात्री साडेदहा ते अकरा वाजताच्या सुमारास माहूरकडे दर्शनासाठी निघाले. रात्री बाराच्या सुमारास माहूरला पोहचून त्यांनी श्री रेणुका मातेचे दर्शन घेतले. पहाटे पाच वाजताच्या सुमारास त्यांनी यवतमाळकडे परतीचा प्रवास सुरू केला. मात्र, घरी पोहचण्याआधीच रेणुका मातेच्या या भक्तांवर काळाने झडप घातली.

**रात्री दर्शन घेऊन पहाटे घरी येण्यास निघाले...**

यवतमाळमधील एका फर्निचरच्या दुकानात काम करणारे सहा कामगार गुरुवारी रात्री साडेदहाच्या सुमारास टेम्पोने श्री रेणुका मातेचे दर्शन घेण्यासाठी माहूर गडावर गेले होते. मध्यरात्री १२च्या सुमारास देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर पहाटे पाचच्या सुमारास ते परतीच्या प्रवासाला निघाले. घाटातील नागमोडी वळणावर हा अपघात झाला.

**कठडे नसल्याने वाहन थेट दरीत**

समोरुन येणारे वाहन चुकीच्या दिशेने येत होतं. त्या वाहनाच्या हेडलाईटचा तीव्र प्रकाश टेम्पो चालकाच्या डोळ्यांवर पडल्यानं चालकानं धडक टाळण्यासाठी गाडी मोकळ्या जागेकडे वळवण्याचा प्रयत्न केला, मात्र वळणावर मजबूत संरक्षक भिंत नसल्याने टेम्पोचा तोल गेला अन् थेट १०० फूट खोल दरीत कोसळला.

# भक्तिमय वातावरणात आज निघणार श्री माता महाकालीची नगर प्रदक्षिणा पालखी

## सायंकाळी ४ वाजता महाकाली मंदिरातून पालखीला प्रारंभ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाने सुरू असलेल्या श्री माता महाकाली महोत्सवाची सांगता सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी निघणार्या श्री माता महाकालीच्या भव्य नगर प्रदक्षिणा पालखी सोहळ्याने होणार आहे. पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या महोत्सवाचा समारोप मातेच्या पालखीच्या दर्शनाने आणि भक्तिमय वातावरणात होणार असून, या सोहळ्यासाठी भाविकांमध्ये उत्सुकता आहे.

श्री माता महाकाली मंदिरातून उद्या सायंकाळी ४ वाजता पालखीला प्रारंभ होईल. त्यानंतर गिरनार चौक, गांधी चौक आणि जयंत टॉकीज चौक मार्गे पालखी जटपुरा गेटला वळसा घालून कस्तुरबा मार्गाने पुन्हा श्री माता महाकाली मंदिरात पोहोचेल. या नगर प्रदक्षिणेदरम्यान शहरातील विविध भागांत मातेच्या पालखीचे दर्शन घेण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.

या नगर प्रदक्षिणा पालखी सोहळ्यात श्री माता महाकालीच्या उत्सव मूर्तीची व चांदीच्या पालखीची मिरवणूक, मातेच्या रथाचा सहभाग, गंगा आरती, पोतराज नृत्य समूह, झांज-डमरू पथक, शिवतांडव-अघोरी नृत्य, पवनसुत प्रभू श्री बाहुबली हनुमान यांचे बोलके दृश्य, वारकर्यांचा टाळ-मृदंग गजर आणि विविध देवी-देवतांची साकारलेली दृश्ये आकर्षण ठरणार आहेत.

यासोबतच विविध प्रकारची आदिवासी नृत्ये, अश्वावर आरूढ नवदुर्गे चे बोलके दृश्य, तुतारी व अष्टनगरीचा समावेश, मुलांचे लाठी, काठी, दानपट्टा, तलवार आणि भाला यांसारख्या शस्त्रांचे प्रात्यक्षिक, तसेच विविध सामाजिक संघटनांचे झाकी पथक या नगर प्रदक्षिणेची शोभा वाढवणार आहेत. शहरातील विविध व्यायामशाळा, प्रसिद्ध बँड पथके, कलशधारी महिला, लेझीम पथके, ढोल-ताशा व ध्वज पथके, डीजे धुमालांचे विविध संच, दांडिया-गरबा नृत्यसमूह आणि पारंपरिक खेळांचे सादरीकरणही या सोहळ्यात पाहायला मिळणार आहे.

याशिवाय श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित दृश्ये, चंद्रपूर जिल्ह्यातील विविध देवी-देवतांची मंदिरे व पारंपरिक सण-उत्सवांचे देखावे, तंट्या भील व मानवी वेशभूषेवर आधारित सादरीकरणे, बंगाली समाजातील महिलांचे शंखनाद व पुरुषांचे डंकावादन, तसेच स्वच्छतेविषयी जनजागृती करणार्या सामाजिक संस्थांचा सहभाग या सोहळ्याचे विशेष आकर्षण असेल.

पाच दिवसांच्या महोत्सवात धार्मिक कार्यक्रम, सांस्कृतिक सादरीकरणे आणि विविध उपक्रमांनी चंद्रपूरचे वातावरण भक्तिमय झाले आहे. आता उद्याच्या नगर प्रदक्षिणा पालखी सोहळ्याने या महोत्सवाची सांगता होणार असल्याने भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मातेचे दर्शन घ्यावे, असे आवाहन श्री माता महाकाली महोत्सव समीतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शासकीय सेवा आता थेट लाभार्थ्यांच्या दारी; शहापूर तालुक्यात ९ पथकांद्वारे 'सेवा संकल्प' अभियान

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१८, ठाणे :** शासकीय योजनांचे लाभ नागरिकांना थेट त्यांच्या घरापर्यंत सहज आणि विनाविलंब पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प' अभियानांतर्गत घरपोच लाभ वाटप योजनेचा शुभारंभ आमदार दौलत दरोडा यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला. या अभियानांतर्गत महसूल प्रशासनाची नऊ विशेष पथके शहापूर तालुक्यातील गावे, वाड्या-वस्त्यांवर जाऊन पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवा व योजनांचे लाभ उपलब्ध करून देणार आहेत.

ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना शासकीय दाखले, सातबारा उतारे व अन्य सेवांसाठी कार्यालयांचे वारंवार फेरे मारावे लागू नयेत, यासाठी ठाणे जिल्हा प्रशासनाने हा उपक्रम हाती घेतला आहे. महसूल व वन विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्याबरोबरच मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी प्रत्यक्ष गावात जाऊन पात्र लाभार्थ्यांना लाभांचे वाटप करीत आहेत. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचण्यास मदत होत आहे.

अभियानांतर्गत भूमी अभिलेख व महसूलविषयक कामांसाठी सात ई आणि बारा ई उतारे लाभार्थ्यांना दिले जात आहेत. जमिनींच्या नोंदींमधील अटी व शर्तींनुसार बदल करून शर्ती कमी केलेले ४३ अद्ययावत सातबारा उतारेही सुपूर्द करण्यात येत आहेत. याशिवाय, परिसरातील १५ महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले आणि अधिवास दाखल्यांचे वितरण केले जात आहे. प्रलंबित वारस नोंदी पूर्ण करून सुधारित सातबारा उतारे देण्यासोबतच शेतातील पानंद रस्त्यांची उपलब्धता, महत्त्व आणि कायदेशीर बाबींबाबत जनजागृती केली जात आहे.

अभियानाची प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी मंडळनिहाय नऊ विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. ही पथके येत्या सोमवारपर्यंत शहापूर तालुक्यातील प्रत्येक गावात, वाडी-वस्तीवर जाऊन पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहेत.

ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात हे अभियान राबविण्यात येत आहे. अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने आणि तहसीलदार (सामान्य प्रशासन) सचिन चौधर यांच्या नियोजन व सहकार्याने अभियानाला गती मिळाली आहे. शहापूर तालुक्यात प्रांताधिकारी अमित सानप आणि तहसीलदार परमेश्वर कासुळे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत मंडळ गोठेघर येथील मौजे गोठेघरमधील वनपट्टाधारकासाठी स्वतंत्र सातबारा उतारा तयार करून महसूल अधिकाऱ्यांनी तो संबंधित लाभार्थ्याच्या घरी जाऊन सुपूर्द केला. शासकीय सेवा आणि कल्याणकारी योजनांचे लाभ तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ होण्यास मदत होत आहे.

# आरवट - शिवणीत श्रमदानातून ५० मीटरचे काम, भूजल पुनर्भरणाला चालना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** चंद्रपूर वनराई बंधारा उपक्रमातून आरवट-शिवणी येथे जलसंधारणाचे नवे काम पूर्ण झाले आहे. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने श्रमदानातून हा बंधारा उभारला. सराई नाल्यावरील हा बंधारा सुमारे ५० मीटर लांब आहे.



जिल्ह्यातील १५ तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. वाया जाणारे पाणी अडवून भूजल पातळी वाढवणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी या कामात सहभाग घेतला. कमी पावसामुळे पाणीटंचाईची तीव्रता वाढू नये, यासाठी प्रशासन विविध उपाययोजना करत आहे. या बंधाऱ्याचा फायदा परिसरातील शेती आणि विहिरींना होण्याची अपेक्षा आहे.

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीचंचाईवर मात करण्यासाठी आणि भूजल पातळीत वाढ करण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने लोकसहभागातून जलसंधारणांच्या कामांना गती दिली आहे.

जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या वतीने चंद्रपूर तालुक्यातील आरवट-शिवणी येथील सराई नाल्यावर श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील 'पाणी अडवा, पाणी जिरवा' अभियानाला खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे स्वरुप प्राप्त होत आहे.

कमी पावसामुळे जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून उपलब्ध जलस्त्रोतांचे जतन करणे, पावसाचे पाणी साठवणे आणि भविष्यातील टंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासन विविध पातळ्यांवर काम करीत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून चंद्रपूर तहसील कार्यालय आणि चंद्रपूर महसूल मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आरवट-शिवणी परिसरात वनराई बंधारा उभारण्यात आला.

*** ५० मीटर लांबीचा बंधारा साकारला**

आरवट-शिवणी येथील सराई नाल्यावर ५० मीटर लांब, २५ मीटर रुंद व सुमारे २ मीटर खोल अशा भव्य बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. या बंधाऱ्यामुळे नाल्यातून वाया जाणारे पाणी अडवले जाऊन जमिनीत मुरण्यास मदत होईल, ज्यामुळे भूजल पुनर्भरण वेगाने होईल. तसेच या परिसरातील शेती, विहिरा आणि इतर जलस्त्रोतांना याचा मोठा फायदा होणार आहे.

या श्रमदान मोहिमेत उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार विजय पवार, नायब तहसीलदार राजू धांडे, ओंकार ठाकरे, मंडळ अधिकारी प्रवीण वरभे, तालुका कृषी अधिकारी अनिकेत माने, व त्यांचे पथक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख, पाणी फाउंडेशनचे प्रतिनिधी, स्थानिक सरपंच, पोलीस पाटील, तलाठी अनुप वघारे, योगेश सागुळले यांच्यासह महसूल विभागाचे कर्मचारी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आसोलामेंढा व गोसेखुर्द प्रकल्पांशी संबंधित शेतकऱ्यांच्या सिंचन समस्यांच्या निराकरणासाठी आ. मुनगंटीवार यांचा पुढाकार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** शेतीच्या समृद्धीचा मार्ग सिंचनातून जातो, याची जाणीव ठेवून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आसोलामेंढा व गोसेखुर्द प्रकल्पांशी संबंधित शेतकऱ्यांच्या सिंचन समस्यांच्या निराकरणासाठी पुढाकार घेतला आहे. कालव्यांची अपूर्ण कामे, पाइपलाईनमधील गळती, अपुरा पाणीपुरवठा आणि सिंचन सुविधांच्या अभावामुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला.



शेतकऱ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागू नये, त्यांच्या पिकांना पाण्याअभावी नुकसान सोसावे लागू नये आणि सिंचनाच्या पुरेशा सुविधांमुळे शेतीला नवी उभारी मिळावी, या संवेदनशील भूमिकेतून संपूर्ण बल्लारपूर मतदारसंघ सिंचनसुविधांनी समृद्ध करण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याचे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी दिले. संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून सिंचनाचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. दि. १५ ऑक्टोबर रोजी चंद्रपूर येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालयात ही आढावा बैठक पार पडली. बैठकीत आ. मुनगंटीवार यांनी येत्या आठ दिवसांत जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्यासोबत पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांवर विस्तृत बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड यांच्यासोबत बैठक घेऊन जलसंधारणाच्या कामांचा दीर्घकालीन कार्यक्रम आखण्याचे निर्देश दिले.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून एसबी४ जंक्शन लाईनद्वारे आठ गावांतील शेतीला सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना गती मिळाली आहे.

या जंक्शन लाईनचे पाणी एखाद्या गरीब शेतकऱ्याच्या हस्ते सोडण्यात यावे, अशी भावना व्यक्त करताना, गरीब शेतकऱ्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब हा रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीतील संपत्तीइतकाच अनमोल असतो, ही जाणीव त्यांनी अधोरेखित केली. शेतकऱ्यांच्या कष्टांना पाण्याची साथ मिळावी आणि त्यांच्या पिकांना नवसंजीवनी मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. प्रत्यक्ष पाहणी आणि आढावा बैठकीनंतर २० ऑक्टोबर रोजी जंक्शन लाईनला पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यामुळे राजोली, चिखली, गांगलवाडी, डोंगरगाव, चिटकी, लोणखैरी, नवेगाव (लोन) आणि बेंदेवाही या आठ गावांतील शेतकऱ्यांच्या आशा उंचावल्या आहेत.

## थोडक्यात बातम्या

# शेतकऱ्यांसाठी जलसमाधी आंदोलन करणारच !

## २१ ऑक्टोबरला वारकरी धर्म परिषदेची वार्षिक आढावा सभा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, बुलढाणा :** शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नैसर्गिक आपत्तीची मदत सरकारने जाहीर करावी. पाच हजार रुपयांचे तुटपुंजी मदत शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणे पुसणारी आहे. करिता वारकरी धर्म परिषद आणि आझाद हिंद शेतकरी संघटनेच्या वतीने नियोजित जलसमाधी आंदोलनावर आम्ही ठाम आहे. यासह विविध विषय आणि मागण्यांसाठी वारकरी धर्म परिषदेच्या वतीने राष्ट्रीय आणि राज्य पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत वार्षिक सभेचे आयोजन २१ ऑक्टोबरला बुलढाण्यात करण्यात आले आहे.

वारकरी आणि शेतकरी एकच धर्म आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी प्रथमच वारकरी धर्म परिषदेने आंदोलनात्मक भूमिका घेतली आहे. त्या अनुषंगाने वारकरी धर्म परिषदेची वार्षिक आढावा बैठक दसऱ्याच्या पर्वावर २१ ऑक्टोबरला सकाळी ११.३० वामहात्मा फुले शॉपिंग कॉम्प्लेक्स, बुलढाणा येथील मुख्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

सदर वार्षिक सभेला वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष वारकरी धर्मभूषण वासुदेव महाराज शास्त्री,राष्ट्रीय महासचिव हभप प्रबोधनकार ॲड.सतीशचंद्र रोठे पाटील, विदर्भ प्रदेशाध्यक्ष विलास महाराज वाघमारे, यांच्यासह राष्ट्रीय तथा राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची प्रामुख्याने सदर बैठकीला उपस्थित राहणार आहे.

वार्षिक आढावा सभेत पुढील नियोजित वर्षभराचे उपक्रम कार्यक्रमाचे आयोजन, पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा, नवनियुक्ती, तसेच वारकरी धर्म परिषदेने शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची हेक्टरी एक लाख रुपये मदत मिळावी या अनुषंगाने जलसमाधी आंदोलनाची आंदोलनात्मक भूमिका, वारकरी दसरा मेळावा आदी महत्त्वपूर्ण विषयाच्या अनुषंगाने सदर वार्षिक सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकरी तथा वारकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी महत्वपूर्ण असलेल्या वार्षिक सभेला राष्ट्रीय,राज्य तथा जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे.

असे आवाहन आढावा सभेचे निमंत्रक तथा विदर्भ प्रदेशाध्यक्ष विलास महाराज वाघमारे, जिल्हाध्यक्ष प्रकाश महाराज घोंगटे,जिल्हा सचिव नंदकिशोर निमकर्डे, गंगाताई वक्टे,जिल्हा उपाध्यक्ष नंदाताई घोंगटे, प्रसिद्धीप्रमुख विनोद चिपडे,तालुकाध्यक्ष मंदाताई सोनटक्के, सचिव गजानन महाराज थिगळे, संतोष घोंगटे, सुबोध गावंडे, अश्विन आळशी यांच्यासह जिल्हा तथा तालुका पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# डॉ. बरखा दीपक गणवीर यांना पीएच.डी. पदवी प्रदान !

**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.१८, चिमूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील तळोधी (बा.) येथील डॉ. बरखा दीपक गणवीर यांनी आयुर्वेद क्षेत्रात उल्लेखनीय शैक्षणिक यश संपादन केले असून, त्यांना रसशास्त्र व भैषज्य कल्पना या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. सावंगी मेघे, वर्धा येथील महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, अडाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च यांच्या १७ व्या दीक्षांत समारंभात त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ.बरखा दीपक गणवीर यांच्या या यशामुळे तळोधी (बा.) गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. पीएच.डी. पदवी प्राप्त करणाऱ्या तळोधी (बा.) येथील पहिल्या महिला वैद्यकीय डॉक्टर होण्याचा मान त्यांनी मिळवला असून, ही संपूर्ण गावासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब आहे.

त्यांच्या संशोधनाचा विषय Repeated Dose Sub-Chronic Toxicity and Antimicrobial Study of Shilasindoor असा आहे. या संशोधनामध्ये शिलासिंदूरच्या पुनरावृत्त मात्रांमुळे होणाऱ्या उपतीव्र विषारी परिणामांचा तसेच त्याच्या सूक्ष्मजीवविरोधी गुणधर्मांचा शास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनासाठी त्यांना डॉ. भारत राठी, प्राचार्य व विभागप्रमुख, यांचे मार्गदर्शन लाभले.

आयुर्वेदातील रसऔषधींच्या चिकित्सकीय उपयोगांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरू शकते. भविष्यात पुढील टप्प्यातील चिकित्सकीय चाचण्यांमध्ये सकारात्मक निष्कर्ष प्राप्त झाल्यास, दीर्घकालीन आजारांच्या उपचारांमध्ये तसेच प्रतिजैविकांना प्रतिरोधक ठरलेल्या संसर्गांविरुद्ध आयुर्वेदीय रसऔषधींच्या संभाव्य उपयोगाच्या नव्या दिशा उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे या संशोधनाला आयुर्वेदातील औषधांच्या शास्त्रीय मूल्यमापनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. तथापि, अशा चिकित्सकीय उपयोगांची परिणामकारकता आणि सुरक्षितता सिद्ध करण्यासाठी पुढील संशोधन व चाचण्या आवश्यक आहेत. डॉ.बरखा यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तळोधी (बा.) येथील ग्रामस्थ, समाजातील विविध घटक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि संशोधनवृत्तीचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या यशामुळे गावातील इतर विद्यार्थिनींनाही उच्च शिक्षण व संशोधनासाठी प्रेरणा मिळणार आहे.

डॉ. बरखा दीपक गणवीर यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल सर्व समाजबांधव, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक, संशोधनात्मक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# बारामती विमानतळाजवळ उद्योजकावर हल्ला !



**दि.१८, बारामती :** मुंबईत प्रसिद्ध अभिनेता टायगर श्रॉफ याच्या गाडीवर गोळीबार झाल्याची घटना ताजी असताना बारामतीत एका उद्योजकावर हल्ला झाल्याची माहिती समोर येत आहे. बारामती विमानतळाजवळ सायंकाळी एका उद्योजकावर जीवघेणा हल्ला झाल्याने शहरात खळबळ उडाली. राणा शिपिंग कंपनीचे मालक राणा सूर्यवंशी यांना लक्ष्य करण्यात आले. पुष्पगुच्छ देण्याच्या बहाण्याने जवळ आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर हल्ला केल्याची माहिती आहे. या घटनेत सूर्यवंशी यांच्या हाताला जखम झाली असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सायंकाळी साडेसातच्या सुमारास हा प्रकार घडला. हल्ल्याचे वृत्त समोर येताच विमानतळ परिसरात एकच धावपळ उडाली. हल्लेखोरांनी सूर्यवंशी यांच्यावर हल्ला का केला? याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेमागे वैयक्तिक वाद आहे की अन्य काही कारण, याबाबतही स्पष्टता नाही.